**संच : अ**

# शिक्षकांसाठी सूचना                    पाचवी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७–१८

**इयत्ता – पाचवी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना**                    **एकूण गुण : ४०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) भाकर | २) दर्शन |
| ३) शिकारी | ४) रात्र |
| ५) दुपार | ६) नक्कल |
| ७) फैलाव | ८) झेंडा |
| ९) पोस्ट | १०) कॉलर |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'फैलाव' ऐवजी 'फईलाव' किंवा 'शिकारी' ऐवजी 'शीकारी'/'शिकारि' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**आमच्या शेवग्याच्या ..................... फन्ना उडवताना पाहिलं.**

**प्रश्न २) क)** मधमाश्या (गुण १)

**प्रश्न ३) ब)** सहा (गुण २)

**प्रश्न ४)** फुलचुख्या फुलातला मध हवेतून अलगद चोखतो

अशा आशयाचे वाक्य लिहिल्यास (गुण २)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

# संच : अ

**प्रश्न ५ ते ७) ही कविता वाच आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

वाटते सानुली ..... उधळुनि द्यावा.

**प्रश्न ५)** **ब)** झुळूक (गुण १)

**प्रश्न ६)** **ब)** बाजारात, नदीच्या काठावर, राईत, पडक्या वाड्यापाठी (गुण २)

**प्रश्न ७)** कळीचे फूल होताना (गुण २)
(अशा आशयाचे विद्‌यार्थ्यांच्या भाषेतील उत्तर स्वीकारावे. उत्तराच्या स्वरूपानुसार एक किंवा दोन गुण द्‌यावेत.)

**प्रश्न ८ ते १०) खालील जाहिरात वाच. त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ८)** **ब)** पुस्तक (गुण १)

**प्रश्न ९)** होय. प्रत्येक पुस्तकावर ५०% ची घसघशीत सूट (गुण २)

**प्रश्न १०)** हो. आजोबांना जत्रेला जाता येईल. 'सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य' या वाक्यावरून समजले. (गुण २)

**प्रश्न ११)** मारियाने केक खाल्ला. (गुण १)

**प्रश्न १२)** अहमदने होडी तयार केली. (गुण १)

**प्रश्न १३)** समीर आज गावाला जाणार/आहे.
समीर आज गावाला जातो. / समीर आज गावाला गेला (गुण १)

**प्रश्न १४)** योग्य वाक्यास एक गुण. (गुण १)

**प्रश्न १५)** १) अपमान, अभिमान, सन्मान इ. पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण. (गुण १)
२) सुमंगल, शुभमंगल, अमंगल इ. पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण.

**प्रश्न १६)** महाराजांनी विचारले,'' काय नाव बाळांनो तुमचं?'' (गुण १)
(दुहेरी अवतरण चिन्ह व प्रश्नचिन्ह दोन्ही दिल्यास एक गुण. दोन्ही पैकी एक दिल्यास अर्धा गुण)

**प्रश्न १७)** योग्य उत्तर – ''रोहनचा स्पर्धेत प्रथम क्रमांक आला. (गुण २)
रोहन मिठाईच्या दुकानात गेला.
त्याने पेढे आणले.
पेढे सर्वांना वाटले.
सर्वांनी पेढे खाल्ले.

**प्रश्न १८)** 'वावर' या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ असलेली दोन वाक्ये असल्यास दोन गुण द्‌यावेत. (गुण २)



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**प्रश्न १९. खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण प्रसंगाचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले लेखन. |
| ४ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |

**प्रश्न २०. खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

**संच : अ**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**अक्षय सुटीत आईबरोबर मामाकडे गेला. मामाच्या घरासमोरच गावातील शाळा होती. सुटी असूनही गावातली झाडून सारी मुलं शाळेच्या विस्तीर्ण पटांगणात खेळायला जमत असत. अक्षयही मामाच्या मुलासोबत त्यांच्यात खेळायला गेला. भर दुपारी मुलं लगोरी खेळत होती. शाळेच्या बाजूलाच एक रसवंतीगृह होते. ते पाहून अक्षय म्हणाला, ''अरे वा रस!'' खेळून झाल्यावर दोघेही रसाच्या दुकानात गेले. अक्षयने एका दमात रसाचा ग्लास संपवला. रसाचे पैसे दिले आणि दोघेही घरी परतले.**

**वाचनासाठी गुणदान :**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण** **योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) अक्षय खेळायला कोणासोबत गेला?** (१) (ब)

अ) मामासोबात.

ब) मामाच्या मुलासोबत.

क) शाळेतील मुलांसोबत.

**तोंडी प्रश्न ३) अक्षय कोणत्या सुटीत मामाकडे गेला असेल?** (२) (अ)

अ) उन्हाळ्याच्या सुटीत.

ब) दिवाळीच्या सुटीत.

क) नाताळच्या सुटीत.

**तोंडी प्रश्न ४) अक्षयला उसाचा रस आवडला होता का?**
**तुला हे कशावरून कळले?** (२)

(होय, ''अरे वा रस!'' या अक्षयच्या वाक्यावरून कळले किंवा अक्षयने एका दमात रसाचा ग्लास संपवला या वाक्यावरून.)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*